नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २८७ Issue - 287 | वार सोमवार दि. ९ मार्च २०२६ Blow- Monday Date 9 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# टी-२० क्रिकेटमध्ये भारत तिसऱ्यांदा विश्वविजेता

## यजमान भारताने घरच्या मैदानावर जिंकला वर्ल्डकप; विश्वविजेता भारत, फायनलमध्ये ९६ धावांनी विजय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहमदाबाद : अहमदाबादच्या जगातल्या सगळ्यात मोठ्या स्टेडियम वर सव्वा लाख चाहत्यांच्या साक्षीने भारतीय संघाने दणदणीत वर्चस्वासह टी-२० वर्ल्डकपच्या अंतिम लढतीत न्यूझीलंडचा धुव्वा उडवत जे-तेपदावर नाव कोरले. २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वात भारतीय संघाने जेतेपदाची कमाई केली होती. आतापर्यंत कोणत्याच संघाला जेतेपद कायम राखता आले नव्हते. दोन वर्षांपूर्वी रोहितसेनेचा भाग असणाऱ्या सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारतीय संघाने अंतिम मुकाबल्यात प्रथम फलंदाजी करताना २५५ धावांचा डोंगर रचला. संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि इशान किशन या आघाडीच्या शिलेदारांनी वादळी अर्धशतकी खेळी साकारत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. या डोंगरासमोर खेळताना न्यूझीलंडने नियमित अंतरात विकेट्स गमावल्या. तिलक वर्माने लॉकी फर्ग्युसनचा झेल घेताच खेळाडूंनी एकच जल्लोष केला. न्यूझीलंडचा डाव १५९ धावांतच आटोपला.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भार-ताने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. सलामीवीर अभिषेक शर्माने अवघ्या २१ चेंडूंत ५२ धावांची (६ चौकार, ३ षटकार) स्फोटक खेळी करत पॉवरप्लेमध्ये भारताला ९२ धावांपर्यंत मजल मारून दिली. त्यानंतर संजू सॅमसनने आपल्या फॉर्मचे सोने करत ४६ चेंडूंत ८९ धावांची (५ चौकार, ८ षटकार) मॅरेथॉन खेळी केली. त्याला इशान किशनने (२५ चेंडूंत ५४ धावा) म ोलाची साथ दिली. अखेरच्या षटकात शिवम दुबेने ८ चेंडूंत २६ धावा कुटल्यामुळे भारताने २० षटकांत ५ बाद २५५ धावांचे हिमालयासारखे लक्ष्य न्यूझीलंडसमोर ठेवले. २५६ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. जसप्रीत बुमराहने आपल्या ४ षटकांत केवळ १५ धावा देत ४ बळी टिपले आणि किवींच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. फिरकीपटू अक्षर पटेलने २७ धावांत ३ महत्त्वाचे मोहरे टिपून त्याला उत्तम साथ दिली. न्यूझीलंडकडून केवळ टिम सीफर्टने (२६ चेंडूंत ५२ धावा) थोडा प्रतिकार केला, मात्र इतर फलंदाजांनी भारतीय गोलंदाजीसमोर नांगी टाकली. डॅरिल मिचेल (१७) आणि मिचेल सँटनर (४३) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण वाढत्या धावगतीचा दबाव त्यांना सोसता आला नाही. संपूर्ण न्यूझीलंडचा संघ १९ व्या षटकात १५९ धावांवर गारद झाला.




**न्यूझीलंडचा टॉस जिंकून गोलंदाजीचा निर्णय**

न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. या निर्णयाने अनेकांच्या भुवया उंचावल्या कारण मोठ्या लढतींमध्ये नाणेफेक जिंकून फलंदाजी पत्करावी, मोठी धावसंख्या रच-ावी आणि त्याचा बचाव करावा असं धोरण कर्णधार अवलंबतात. सँटनरने वेगळा विचार करत गोलंदाजीचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने फायनलसाठी ऑफस्पिनर कोल मॅकहोनीऐवजी वेगवान गोलंदाज जेकब डफीचा संघात समावेश केला. भारतीय संघाने वरुण चक्रवर्तीवर विश्वास ठेवत त्याला अंतिम अकरात कायम राखले.

**शिवम दुबेचा 'फिनिशिंग' टच**

टी-२० क्रिकेटमध्ये शिवम दुबेची भूमिका अतिशय महत्वाची ठरते. इंग्लंडविरूद्ध झालेल्या सामन्यात त्याने चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला येऊन ४३ धावांची वादळी खेळी केली होती. न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्यात त्याला सातव्या क्रमांकावर फलंदाजीला येण्याची संधी मिळाली. शेवटच्या षटकांमध्ये फलंदाजी करताना त्याने ८ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या साहाय्याने नाबाद २६ धावांची खेळी केली.

**बुमराहच्या वेगाची जादू**

फलंदाजांनी आपले काम योग्यरित्या पूर्ण केले होते. त्यामुळे सर्व जबाबदारी गोलंदाजांवर होती. आव्हान मोठं होतं. पण न्यूझीलंडच्या ताफ्यातही एकापेक्षा एक स्फोटक फलंदाज होते. त्यांना लवकर बाद केलं नसतं. तर टीम इंडियाचं टेन्शन वाढलं असतं. त्यामुळे सूर्यकुमार यादवने जसप्रीत बुमराहला लवकर गोलंदाजीला बोलवलं. बुमराह-ने पहिल्याच चेंडूवर रचिन रवींद्रला बाद करत माघारी धाडलं. बुमराहने या सामन्यात गोलंदाजी करताना ४ षटकात १५ धावा खर्च करून ४ गडी बाद केले.

**संजू-अभिषेकचा शानदार शो!**

भारताचे सलामीवीर अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन या जोडीने इतिहास घडवला आहे. भारता-ने नाणेफेक गमावली असली तरी संघाला प्रथम फलंदाजी करायची होती. टीम इंडियाचा हा निर्णय अगदी योग्य ठरला. संजू सॅमसन व अभिषेक शर्माच्या जोडीने २४ चेंडूंत ५० धावांची भागीदारी केली. टी-२० विश्वचषक अंतिम सामन्याच्या इतिहासात पहिल्यांदाच हा पराक्रम करण्यात आला. यापूर्वी, २००७ ते २०२४ पर्यंत, कोणत्याही सलामी जोडीने अंतिम सामन्यात पन्नासपेक्षा जास्त सलामीची भागीदारी केली नव्हती.

**अंतिम सामन्यात अभिषेक चम कला**

अंतिम सामन्यात फलंदाजी करताना अभिषेक शर्माने अवघ्या १८ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. यासह आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत सर्वात जलद अर्धशतकी खेळी करणारा फलंदाज ठरला आहे. याआधी हा विक्रम जेकब बेथेल आणि फिन ॲलेनच्या नावावर होता. दोघांनी १९ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं होतं. या दमदार अर्धशतकी खेळीच्या बळावर भारतीय संघाने पावरप्लेमध्ये ९२ धावा केल्या.

**सॅमसनची विक्रमाला गवसणी**

संजू सॅमसनला या स्पर्धेतील काही मोजकेच सामने खेळण्याची संधी मिळाली. पण या सर्व साम न्यांमध्ये संजू सॅमसनने आपली छाप सोडली. वेस्ट इंडिजविरूद्ध झालेल्या सुपर ८ फेरीतील शेवटच्या सामन्यात नाबाद ९७ धावांची खेळी केली होती. त्यानंतर इंग्लंडविरूद्ध झालेल्या सेमी फायनलच्या सामन्यात त्याने ८९ धावांची खेळी केली होती. या दोन्ही सामन्यात त्याला शतक झळकावण्याची संधी होती. पण ही संधी थोडक्यात हुकली होती. अंतिम सामन्यातही त्याला शतक झळकावण्याची संधी होती. पण ८९ धावांवर फलंदाजी करत असताना मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात तो बाद होऊन माघारी परतला. हे त्याचे या स्पर्धेतील लागोपाठ तिसरे अर्धशतक ठरले. तसेच तो टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील पावरप्लेमध्ये फलंदाजी करताना सर्वाधिक षटकार मारणारा भारतीय फलंदाज ठरला आहे. त्याने या स्पर्धेतील पावरप्-लेमध्ये फलंदाजी करताना १० हून अधिक षटकार मारले आहेत.

**अक्षर पटेलची सुवर्ण कामगिरी**

अक्षर पटेल हा भारतीय संघाच्या ऐतिहासिक विजयाचा खरा अनसंग हिरो ठरला. गेल्या सामन्यात २ भन्नाट कॅच पकडून भारताचा विजय खेचून आणणाऱ्या अक्षरला या सामन्यात फलंदाजीला येण्याची संधी मिळाली नाही. पण गोलंदाजी करताना त्याने न्यूझीलंडला लागोपाठ धक्के दिले. आधी फिन ॲलेनला अवघ्या ९ धावांवर झेलबाद करून माघारी धाडलं. त्यानंतर ग्लेन फिलिप्सची दांडी गुल केली. अक्षरने या सामन्यात ३ गडी बाद केले. चौकट

थोडक्यात धावफलक: भारत: २५५/५ (संजू सॅमसन ८९, ईशान किशन ५४, जिमी नीशम ३/४६) न्यूझीलंड: १५९/१० (टिम सायफर्ट ५२, जसप्रीत बुमराह ४/१५, अक्षर पटेल ३/२७) निकाल: भारत ९६ धावांनी विजयी.

# माढ्यात दोन गटात जोरदार हाणामारी, भाजप जिल्हा परिषद सदस्याच्या पतीसह चौघांवर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**सिना-माढा उपसा सिंचन योजनेच्या कॅनलवरून दोन गटांमध्ये वाद**

सोलापूर : आज रंगपंचमी आणि महिला दिनाच्या पार्श्वभूम ीवर माढा तालुक्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दोन गटात झालेल्या जीव घेण्या हाणामारीत १० जण गंभीर जखमी झाले आहेत. चिंचोली गावाजवळ सिना-माढा उपसा सिंचन योजनेच्या कॅनलवर दोन गटांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर जबर मारहाणीत झालं आहे. भाजपच्या जिल्हा परिषद सदस्य म ाधुरी मोरे यांचे पती मुन्ना मोरे यांच्यासह बावी गा-वातील चौघांवर मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माढा तालुक्यातील चिंचोली परिसरात ही घटना घडली आहे. सिना-म ाढा उपसा सिंचन योजनेच्या कॅनलवरून दोन गटांमध्ये आधी शाब्दिक वाद झाला आहे. मात्र काही वेळातच या वादाचे रुपांतर मोठ्या हाणामारीत झाले आहे. काठी-लाथाबुक्क्यांनी झालेल्या या मारहाणीत महिलांसह सुमारे दहा जण जखमी झाले आहेत. या प्रकरणी माढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाजपच्या जिल्हा परिषद सदस्य माधुरी मोरे यांचे पती मुन्ना म ोरे यांच्यासह बावी गावातील चौघांवर मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुसऱ्या गटाकडूनही परस्पर विरोधी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# अमेरिकेचा इराणवर सर्वात मोठा हल्ला; थेट तेल डेपोला भीषण आग! आकाशात धुराचे आगीचे लोट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : गेल्या काही दिवसांपासून अमेरिका-इस्रायलचा इराणवर संयुक्त हल्ला सुरूच आहे. इराणही या हल्ल्यांना चोख उत्तर देत आहे. अशातच आता अमेरिकेने इराणवर सर्वात मोठा हल्ला केला आहे.

शनिवार ७ मार्च रोजी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर मध्यरात्री मोठा हल्ला करणार असल्याची धमकी दिली. त्यानंतर अमेरिका आणि इस्त्रायलकडून अत्यंत घातक हल्ला इराणवर करण्यात आला. अमेरिकेने तेहरानमध्ये हा सर्वात मोठा हल्ला केला.

इराणची राजधानी तेहरा-नवर अमेरिकेकडून बॉम्बहल्ला करण्यात आला आहे. इस्रायल आणि अमेरिकेने मेहराबाद विमानतळाला बॉम्ब हल्ले केले. विमानाच्या इंधन डेपोवरही हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यानंतर मोठा धमका झाला. इराणच्या तेहरानमध्ये अमेरिकेने थेट तेल डेपोवर हल्ला करत आग लावली. यानंतर आकाशात धूर पसरला. आग मोठी भडकली आणि फक्त धूरच दिसत होता.

अमेरिकेने केलेल्या या इंधन डेपोवरील हल्ल्यात इरा-णचे मोठे नुकसान झाले आहे. तेहरान शहर अमेरिका आणि इस्त्रायलच्या सुरूवातीपासूनच निशाण्यावर आहे. त्यामध्येच आता थेट हल्ले करण्यात आला आहे. आता या हल्ल्याला इराण कसं उत्तर देईल याची कल्पना करणं कठीण आहे.

सतत इतके मोठे हल्ले होत



असतानाही इराण हार मानत नाही आहे. आपण कोणत्याही परिस्थितीत शरणागती स्वीकारणार नाही असे इराणने स्पष्ट सांगितले आहे.

**भारतीयांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू**

**भारतीय दूतावासांकडून नागरिकांसाठी नियमित सूचना (ऍडव्हायजरी) जारी**

# इराण-इस्त्रायल संघर्षानंतर ५२ हजारांहून अधिक भारतीय मायदेशी परतले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : इराण-इस्त्रायल संघर्षानंतर पश्चिम आशियातील काही देशांमध्ये हवाई क्षेत्र अंशतः पुन्हा सुरू झाल्यानंतर आतापर्यंत ५२ हजारांहून अधिक भारतीय नागरिक स्वदेशात परत-ले. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने शनिवारी रात्री उशिरा जारी केलेल्या निवेदनात ही माहिती दिली. मंत्रालयाने सांगितले की पश्चिम आशियातील परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात असून तेथे अडकलेल्या भारतीयांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की त्या प्रदेशातील भारतीय दूतावासांकडून नागरिकांसाठी नियमित सूचना (ऍडव्हायजरी) जारी केली जात आहे. तसेच भारतीयांच्या मदतीसाठी २४७हेल्पलाइन सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. भारत सरकार आपल्या नागरिकांच्या सुरक्षा आणि कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देते आणि या भागातील गरजू भारतीयांना मदत करण्यासाठी संबंधित देशांच्या सरकारांशी सतत संपर्कात आहे.मंत्रालयाने सर्व भारतीय नागरिकांना स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे तसेच भारतीय दूतावासांकडून जारी करण्यात आलेल्या सल्ल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

युद्ध सुरू झाल्यानंतर गेल्या काही दिवसांत भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांनी पुन्हा व्यावसायिक उड्डाणे सुरू केली आहेत. या उड्डाणांचा फायदा घेत आतापर्यंत ५२ हजारांपेक्षा जास्त भारतीयांनी स्वदेश गाठले. भारतीय विमान कंपन्यांद्वारे १ ते ७ मार्च दरम्यान ३२ हजार १०७ प्रवाशांनी प्रवास केला असून पुढील काही दिवसांत आणखी उड्डाणांचे नियोजन करण्यात आले आहे.

संकटग्रस्त देशांमधील भारतीय दूतावासांनी २४ तास नियंत्रण कक्ष (कंट्रोल रूम) सुरू केले असून तेथून नागरिकांना तात्काळ माहिती आणि आवश्यक मदत दिली जात आहे. केंद्र सरकारने भारतीयांना इराणी आणि प्रभावित भागांमध्ये अनावश्यक प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे. इराण आणि इस्त्रायल यांच्यात वाढत्या तणा-वामुळे तसेच आखाती देशांच्या हवाई क्षेत्रावर परिणाम झाल्याने हवाई तिकिटांच्या दरांमध्ये चढ-उतार दिसून येत आहेत. मात्र परतू इच्छिणाऱ्या नागरिकांना परवडणारे आणि सोयीस्कर पर्याय उपलब्ध व्हावेत यासाठी भारत सरकार विमान कंपन्यांशी संपर्कात आहे.



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### जगज्जेता

अहमदाबादच्या जगातल्या सगळ्यात मोठ्या स्टेडियमवर सव्वा लाख चाहत्यांच्या साक्षीने भारतीय संघाने दणदणीत वर्चस्वासह टी-२० वर्ल्डकपच्या अंतिम लढतीत न्यूझीलंडचा धुव्वा उडवत जेतेपदावर नाव कोरले. २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वात भारतीय संघाने जेतेपदाची कमाई केली होती. आतापर्यंत कोणत्याच संघाला जेतेपद कायम राखता आले नव्हते. दोन वर्षांपूर्वी रोहितसेनेचा भाग असणाऱ्या सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारतीय संघाने अंतिम मुकाबल्यात प्रथम फलंदाजी करताना २५५ धावांचा डोंगर रचला. संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि इशान किशन या आघाडीच्या शिलेदारांनी वादळी अर्धशतकी खेळी साकारत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. या डोंगरासमोर खेळताना न्यूझीलंडने नियमित अंतरात विकेट्स गमावल्या. तिलक वर्माने लॉकी फर्ग्युसनचा झेल घेताच खेळाडूंनी एकच जल्लोष केला. न्यूझीलंडचा डाव १५९ धावांतच आटोपला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. सलामीवीर अभिषेक शर्माने अवघ्या २१ चेंडूंत ५२ धावांची स्फोटक खेळी करत पॉवरप्लेमध्ये भारताला ९२ धावांपर्यंत मजल मारून दिली. त्यानंतर संजू सॅमसनने आपल्या फॉर्मचे सोने करत मॅरेथॉन खेळी केली. त्याला इशान किशनने मोलाची साथ दिली. २५६ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. जसप्रीत बुमराहने आपल्या ४ षटकांत केवळ १५ धावा देत ४ बळी टिपले आणि किवींच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. फिरकीपटू अक्षर पटेलने २७ धावांत ३ महत्त्वाचे मोहरे टिपून त्याला उत्तम साथ दिली. किवी फलंदाजांनी भारतीय गोलंदाजीसमोर नांगी टाकली. वाढत्या धावगतीचा दबाव त्यांना सोसता आला नाही. संपूर्ण न्यूझीलंडचा संघ १९ व्या षटकात १५९ धावांवर गारद झाला. न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. या निर्णयाने अनेकांच्या भुवया उंचावल्या कारण मोठ्या लढतींमध्ये नाणेफेक जिंकून फलंदाजी पत्करावी, मोठी धावसंख्या रचावी आणि त्याचा बचाव करावा असं धोरण कर्णधार अवलंबतात. संजू सॅमसनला या स्पर्धेतील काही मोजकेच सामने खेळण्याची संधी मिळाली. पण या सर्व सामन्यांमध्ये संजू सॅमसनने आपली छाप सोडली. वेस्ट इंडिजविरूद्ध झालेल्या सुपर ८ फेरीतील शेवटच्या सामन्यात नाबाद ९७ धावांची खेळी केली होती.

# जागतिक महिला दिन : सन्मानाचा उत्सव की संघर्षांची जाणीव?

जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. पण हा केवळ शुभेच्छांचा, गुलाबांच्या फुलांचा आणि सोशल मीडियावरच्या पोस्टांचा दिवस आहे का? की हा दिवस आहे आत्मपरीक्षणाचा. समाज म्हणून आपण स्त्रीच्या सन्मान, सुरक्षितता आणि समानतेसाठी नेमकं काय केलं याचा हिशेब मांडण्याचा? जागतिक महिला दिनाची संकल्पना ही फक्त उत्सवासाठी जन्माला आलेली नाही. १९०८ साली न्यूयॉर्क येथे कामगार महिलांनी समान वेतन, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि मतदानाचा अधिकार यासाठी आंदोलन छेडले. त्या आंदोलनातून उगम पावलेला हा दिवस पुढे युनायटेड नॅशन्सने १९७५ मध्ये याला अधिकृत मान्यता दिली आणि जगभर स्त्री-अधिकारांच्या लढ्याचे प्रतीक म्हणून तो साजरा होऊ लागला. म्हणजेच, हा दिवस आहे संघर्षाचा, स्वाभिमानाचा आणि परिवर्तनाचा.

भारतात स्त्री शिक्षणाची टक्केवारी वाढली आहे, अनेक महिला प्रशासन, उद्योग, विज्ञान, क्रीडा, राजकारण अशा सर्व क्षेत्रांत झेंडा रोवत आहेत. द्रौपदी मुर्मू राष्ट्रपतीपदी विराजमान आहेत; वित्त, संरक्षण, अवकाश संशोधन अशा महत्त्वाच्या क्षेत्रांत महिलांनी नेतृत्व सिद्ध केले आहे. पण दुसरीकडे, घरगुती हिंसाचार, लैंगिक अत्याचार, कार्यस्थळी छळ, बालविवाह, स्त्रीभ्रूणहत्या यासारख्या समस्या अजूनही विदारक वास्तव म्हणून समोर आहेत. शिक्षण घेतलेल्या, आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या महिलेलाही सुरक्षिततेची हमी नाही, ही वस्तुस्थिती मन हेलावून टाकणारी आहे. महिलांच्या सन्मानासाठी कायदे झाले, २०१३ चा 'कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा', बालविवाह प्रतिबंध, घरेलू हिंसाचार प्रतिबंध पण कायदे कागदावर असले तरी त्यांची अंमलबजावणी कितपत प्रभावी आहे? समाजाची मानसिकता बदलल्याशिवाय स्त्री सन्मानाचे स्वप्न पूर्ण होणार नाही. स्त्री-पुरुष समान आहेत ही घोषणा आपण सहज करतो पण घरातील कामांची विभागणी पाहिली, तर अजूनही स्वयंपाकघराची जबाबदारी स्त्रीचीच मानली जाते. नोकरी करणारी स्त्री असो वा गृहिणी तिचा दिवस पहाटेपासून रात्रीपर्यंत कष्टांनी भरलेला असतो. तिच्या श्रमाला 'कर्तव्य' म्हणत आपण त्याची किंमत मोजतच नाही.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

ग्रामीण भागात तर अजूनही अनेक मुली शिक्षणाऐवजी घरकाम किंवा लवकर लग्नाच्या चक्रात अडकतात. शहरात करिअर करणाऱ्या महिलेला 'घर सांभाळशील का?' हा प्रश्न विचारला जातो; पण पुरुषाला 'घर सांभाळशील का?' असा प्रश्न विचारला जात नाही. हीच मानसिक दरी आहे.

स्त्री म्हणजे केवळ नात्यांची ओळख नाही तर आई, बहीण, पत्नी, मुलगी या नात्यांतूनच स्त्रीची ओळख ठरवण्याची सवय आपण लावून घेतली आहे. पण ती केवळ कोणाची तरी 'आई' किंवा 'पत्नी' नाही; ती स्वतःच्या स्वप्नांची, ध्येयांची, क्षमतेची स्वतंत्र व्यक्ती आहे. सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू करताना समाजाच्या प्रचंड विरोधाला सामोरे जावे लागले. त्यांच्यावर दगड-चिखल फेकला गेला, अपमान झाला; पण त्यांनी हार मानली नाही. आज शिक्षणाच्या क्षेत्रात मुलींची वाढती संख्या ही त्याच संघर्षाची फलश्रुती आहे. स्त्रीशक्तीचे प्रतीक म्हणून आपण देवींची पूजा करतो, पण घरातील स्त्रीला निर्णयप्रक्रियेत समान स्थान देतो का? पूजा आणि प्रत्यक्ष वागणूक यातला विरोधाभास आजही जिवंत आहे.

स्त्री रात्री उशिरा सुरक्षितपणे रस्त्यावर चालू शकेल का? हा प्रश्न आजही उत्तराच्या प्रतीक्षेत आहे. मुलींना लहानपणापासून सावध रहा, असे करू नकोस, तिथे जाऊ नकोस असे शिकवले जाते; पण मुलांना आदर कर, जबाबदारीने वाग हे कितपत शिकवले जाते? महिला सुरक्षेचे प्रश्न केवळ पोलिस-प्रशासनापुरते मर्यादित नाहीत; ते सामाजिक संस्कारांशी जोडलेले आहेत. घरापासून शाळेपर्यंत आणि माध्यमांपासून मनोरंजनापर्यंत स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हा शक्तिशाली मंच आहे. महिलांना स्वतःचा आवाज मांडण्याची संधी मिळाली आहे; पण त्याचबरोबर ऑनलाइन ट्रोलिंग, सायबर छळ, अपमानास्पद टिप्पणी यांचाही सामना करावा लागतो. एका बाजूला महिला पायलट, शास्त्रज्ञ, खेळाडू म्हणून देशाचा अभिमान वाढवत आहेत; तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या कपड्यांवर, व्यक्तिमत्त्वावर टीका केली जाते. स्त्रीची कर्तृत्वापेक्षा तिच्या बाह्य रूपावर अधिक चर्चा होते, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे.

महिला दिनी भाषणे, सन्मान सोहळे, पुरस्कार हे सर्व महत्त्वाचे आहेत पण तेवढ्याने परिवर्तन घडणार नाही.



बदलाची सुरुवात घरापासून व्हायला हवी. मुलगा आणि मुलगी यांना समान संधी, समान संस्कार, समान अपेक्षा दिल्या पाहिजेत. शाळांमध्ये लिंग-संवेदनशील शिक्षण आवश्यक आहे. माध्यमांनी जबाबदारीने स्त्रीप्रतिमा मांडली पाहिजे. राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व वाढले पाहिजे. निर्णयप्रक्रियेत त्यांचा आवाज अधिक प्रभावी झाला पाहिजे. स्त्री रोज लढते कधी घरात, कधी कामावर, कधी समाजात आणि कधी स्वतःच्या मनात. तिच्या डोळ्यात स्वप्ने असतात पण त्यांना पूर्ण करण्यासाठी तिला अनेक अडथळ्यांवर मात करावी लागते. जागतिक महिला दिन हा तिच्या संघर्षाला सलाम करण्याचा दिवस आहे. तिच्या जिद्दीचा, कर्तृत्वाचा आणि सहनशक्तीचा सन्मान करण्याचा दिवस आहे पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे हा दिवस आहे तिच्या वेदना समजून घेण्याचा, तिच्या आवाजाला ऐकण्याचा आणि तिच्या सोबत उभे राहण्याचा.

८ मार्च हा फक्त कॅलेंडरवरील एक दिवस नाही; तो समाजाच्या प्रगतीचा आरसा आहे. आपण खरोखरच स्त्रीला समानतेचे स्थान दिले आहे का? की अजूनही ती अनेक बंधनांत अडकलेली आहे? महिला दिनाच्या शुभेच्छा देताना आपण एक वचन देऊ या स्त्रीला केवळ सन्मानाचे शब्द नव्हे, तर समानतेची संधी देऊ, तिच्या स्वप्नांना आकाश देऊ आणि तिच्या सुरक्षिततेची हमी देऊ. स्त्री सशक्त झाली, तर समाज सशक्त होईल. कारण स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नाही तर ती राष्ट्रनिर्मितीची शक्ती आहे. जागतिक महिला दिनानिमित्त प्रत्येक स्त्रीला मनापासून सलाम तिच्या अस्तित्वाला, तिच्या संघर्षाला आणि तिच्या उज्ज्वल भविष्यासाठीच्या आशेला. हा दिवस उत्सवाचा असो पण त्याहून अधिक परिवर्तनाचा असो. स्त्री ही शक्ती आहे, संवेदना आहे, संघर्ष आहे आणि सृजन आहे. तिच्याशिवाय समाज अपूर्ण आहे; तिच्या सन्मानाशिवाय प्रगती अपूर्ण आहे.

महिला सक्षमीकरणाबाबत बोलताना आर्थिक स्वातंत्र्य हा महत्त्वाचा मुद्दा आहे. स्वतः कमावणारी स्त्री निर्णय घेण्यास अधिक सक्षम होते. स्वयं-सहाय्यता गट, स्टार्टअप्स, लघुउद्योग यांमुळे अनेक महिलांनी आर्थिक स्वावलंबन मिळवले आहे. परंतु वेतनातील असमानता अजूनही दिसते. समान कामासाठी समान वेतन ही संकल्पना अजून पूर्णत्वाला गेलेली नाही. ग्रामीण शेतमजुरीपासून ते कॉर्पोरेट कार्यालयांपर्यंत महिलांना अनेकदा कमी मोबदला दिला जातो. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे केवळ पैसा नव्हे; तो आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि सन्मान यांचा पाया आहे. तुमच्या कर्तृत्वाला नवं आकाश लाभो, स्वप्नांना नवी दिशा मिळो आणि आयुष्याच्या प्रत्येक वाटेवर सन्मान, सुरक्षितता आणि समानतेची साथ लाभो, हीच सदिच्छा. तसेच जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांना मनःपूर्वक शुभेच्छा!

# अजीम नवाज राही यांच्या शब्दप्रवासाने साखरखेर्डा गावाला मानसन्मानाचे वलय बहाल केले : ठाणेदार गजानन करेवाड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : अजीम नवाज राही यांच्या लेखणीने आणि वाणीने साखरखेर्डा गावाच्या नावाभोवती मानसन्मानाचे वलय निर्माण केले.एकीकडे त्यांची कविता सकस आहे तर दुसरीकडे त्यांची वाणी रसाळ. त्यांची डोळस कविता जगणं आणि भोगणं यात कुठलाही आडपदा न ठेवता कागदावर उतरते.अजीम नवाज राही यांची कविता सर्वसामान्य माणसाच्या कष्टाळू दैनंदिनीचं प्रतिनिधीत्व करते असते मनस्वी प्रतिपादन साखरखेर्डा पोलीस स्टेशनचे साहित्यरसिक ठाणेदार गजानन दिगंबरराव करेवाड यांनी केले.

आज ६ मार्च रोजी साखरखेर्डा पोलीस स्टेशनच्या वतीने प्रख्यात मराठी कवी आणि नामवंत निवेदक अजीम नवाज राही यांच्या ,,वळीवाच्या वेळा,, वाङ्मयीनक्षेत्रात सध्या गाजत असलेल्या या कवितासंग्रहाला लोकनेते राजारामबापू पाटील उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार २०२५ पुरस्कार मिळाल्याबद्दल पोलीस स्टेशनच्या मुख्यकार्यालयात सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.प्रारंभी शाल,पुष्पगुच्छ देऊन अजीम नवाज राही यांचा सत्कार ठाणेदार गजानन दिगंबरराव करेवाड आणि दुय्यम ठाणेदार संदीप मेंधणे यांनी केला.

सत्काराच्या उत्तरादाखल अजीम नवाज राही म्हणाले की, ज्या गावात जन्मलो, ज्या गावाने घडवलं, मढवलं त्या माझ्या आवडत्या साखरखेर्डा गावच्या मातीचा सृजनशील सुगंध माझ्या अख्ख्या शब्दप्रवासात ओथंबून आहे. गावकरी माझ्या सन्मानाला आपला सन्मान समजतात ही बाब मला सतत नवी ऊर्जा,नवं बळ देणारी आहे.गावकऱ्यांच्या याच अतुलनीय प्रेमाने प्रतिकूल परिस्थितील जटील आव्हाने लिलया पेलण्याची शब्दातीत ताकद मला दिली. शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला १८ फेब्रुवारी रोजी साखरखेर्डा सार्वजनिक उत्सव समितीने,,अमोघ शब्दधन,, पुरस्कार देऊन माझ्या शब्दयात्रेचा गौरव केला. आज साखरखेर्डा पोलीस स्टेशनच्या वतीने जिव्हाळ्याचा सत्कार झाला.जिथे पिकते तिथे विकत नाही ही म्हण माझ्या गावाने कधीची मोडून काढली आहे.गावकऱ्यांच्या ऋणाच्या ओझ्याखाली माझी शब्दयात्रा विनम्रपणे वाकून गेली आहे.

# नारीशक्तीचा जागतिक प्रवास : समतेच्या स्वप्नाकडून सशक्तीकरणाच्या वास्तवाकडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी ८ मार्च हा दिवस संपूर्ण जगभर 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. हा केवळ उत्सवाचा दिवस नाही, तर स्त्रीच्या संघर्षांचा, कर्तृत्वाचा, स्वाभिमानाचा आणि समतेच्या आकांक्षेचा इतिहास पुन्हा एकदा स्मरणात आणणारा आणि भविष्याच्या दिशेने नवी प्रेरणा देणारा दिवस आहे. १९व्या शतकाच्या अखेरीस आणि २०व्या शतकाच्या प्रारंभी औद्योगिक क्रांतीनंतर स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठू लागला. कामगार चळवळींमध्ये स्त्रियांनी समान वेतन, सुरक्षित कामाचे तास आणि मतदानाचा अधिकार यांसाठी संघर्ष सुरू केला. या संघर्षाचे संघटित रूप १९०८ मध्ये अमेरिकेत पाहायला मिळाले. पुढे १९१० मध्ये कोपनहेगन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत जर्मन समाजवादी नेत्या क्लारा झेटकिन यांनी महिला दिन साजरा करण्याची कल्पना मांडली. १९११ पासून काही देशांत हा दिवस साजरा होऊ लागला आणि १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने अधिकृत मान्यता दिल्यानंतर त्याला जागतिक स्वरूप प्राप्त झाले. अशा ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आजचा महिला दिन हा स्त्रीसमानतेच्या दीर्घ आणि खडतर प्रवासाचा प्रतीकात्मक टप्पा आहे.

भारतीय समाजरचनेत स्त्रीची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. प्राचीन काळात स्त्री ला देवी समान मानले गेले असले, तरी व्यवहारात स्त्रीला अनेक मर्यादा आणि बंधनांचा सामना करावा लागला. मध्ययुगीन काळात सामाजिक रूढी परंपरांनी स्त्रीच्या शिक्षणावर, स्वातंत्र्यावर आणि सहभागावर बंधने आणली गेली होती. तथापि, १९व्या शतकात समाजसुधारकांच्या चळवळींनी या परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्यास सुरुवात केली. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली; राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेच्या उच्चाटनासाठी लढा दिला; पंडिता रमाबाई यांनी विधवाशिक्षणाचा प्रसार केला. या सुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रीसमानतेचा पाया घातला गेला. स्वातंत्र्यलढ्यातही स्त्रियांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, अरुणा आसफ अली यांसारख्या अनेक महिलांनी नेतृत्व, त्याग आणि धैर्याचे उदाहरण घालून दिले.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट उच्चार केला. भारतीय राज्यघटनेमधील कलम १४, १५ आणि १६ यांनी कायद्यापुढे समानता, लिंगाच्या आधारावर भेदभावास मनाई आणि समान संधीची हमी दिली. यामुळे स्त्रीच्या अधिकारांना संवैधानिक आधार मिळाला आहे. पुढील काळात स्त्रियांच्या संरक्षणासाठी आणि सशक्तीकरणासाठी अनेक कायदे व योजना राबविण्यात आल्या आहेत. स्त्रीहक्क कायदे, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, मातृत्व लाभ



कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा इत्यादींनी स्त्रीसुरक्षेला बळ दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे लाखो महिलांना राजकीय प्रक्रियेत थेट सहभागाची संधी मिळाली आहे. आज ग्रामपंचायतपासून संसदेपर्यंत महिलांचे प्रतिनिधित्व वाढताना दिसते; तरीही संख्यात्मक वाढीबरोबर गुणवत्तापूर्ण आणि प्रभावी सहभागाची आवश्यकता आहे.

शिक्षण हा स्त्रीसशक्तीकरणाचा मूलाधार आहे. मागील काही दशकांत मुलींच्या शालेय प्रवेशदरात लक्षणीय वाढ झाली आहे. उच्चशिक्षणातही मुलींचे प्रमाण वाढत आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, कला आणि संशोधन या सर्व क्षेत्रांत महिलांनी आपली छाप पाडली आहे. विज्ञानक्षेत्रात कल्पना चावला यांचे अंतराळयात्रेतील योगदान प्रेरणादायी ठरले आहे; क्रीडा क्षेत्रात पी. व्ही. सिंधू, मेरी कोम यांनी जागतिक स्तरावर यश संपादन केले आहे; राजकारणात इंदिरा गांधी यांनी देशाचे नेतृत्व केले आहे. या उदाहरणांमधून स्त्रीच्या क्षमतेला योग्य संधी मिळाल्यास ती कोणतेही शिखर गाठू शकते, हे अधोरेखित होते. तथापि, प्रगतीच्या या वाटचालीत अनेक आव्हाने अजूनही कायम आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांच्या संधींमध्ये तफावत दिसून येते. काही ठिकाणी मुलींचे शिक्षण माध्यमिक स्तरानंतर खंडित होते. लवकर लग्न, कुपोषण, आरोग्यसेवेची अपुरी उपलब्धता, लैंगिक भेदभाव, कौटुंबिक हिंसा, मानवी तस्करी, कार्यस्थळी छळ, वेतनातील असमानता अशी विविध स्वरूपे स्त्रीच्या विकासाला अडथळा निर्माण करतात. डिजिटल युगातही महिलांचा तंत्रज्ञानातील सहभाग तुलनेने कमी आहे. सायबर छळासारख्या नव्या समस्या उभ्या राहत आहेत. म्हणूनच महिला दिन हा केवळ गौरवाचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवसही आहे. आर्थिक सशक्तीकरण हा स्त्रीच्या स्वावलंबनाचा कणा आहे. स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांनी बचत, सूक्ष्म वित्त आणि लघुउद्योगाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, खाद्यप्रक्रिया उद्योग अशा विविध उपक्रमांत महिलांचा सहभाग वाढत आहे. शहरी भागात उद्योजकतेकडे महिलांचा कल वाढत असून स्टार्टअप संस्कृतीतही त्या पुढे येत आहेत. मात्र, भांडवलाची उपलब्धता, बाजारपेठेचा विस्तार आणि कौशल्यविकास यांसाठी अधिक धोरणात्मक पाठबळ आवश्यक आहे. समान वेतनाची अंमलबजावणी आणि कार्यस्थळी सुरक्षित वातावरणाची हमी देणे ही शासन व समाज दोघांची जबाबदारी आहे. सामाजिक-सांस्कृतिक स्तरावर स्त्रीची प्रतिमा बदलण्याची गरज आहे. माध्यमांमध्ये स्त्रीचे वस्तुकरण टाळणे, मुलगा मुलगी भेदभाव नष्ट करणे, घरगुती जबाबदाऱ्या समसमान वाटून घेणे, पालकत्वाची जबाबदारी दोघांनी स्वीकारणे या मूल्यांचा प्रसार झाला पाहिजे. लिंगसंवेदनशील शिक्षण आणि समाजीकरणामुळे पुढील पिढी अधिक समताधिष्ठित विचार स्वीकारू शकेल. महिला दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शासन विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात; परंतु या उपक्रमांचा परिणाम वर्षभर टिकणारा असणे महत्त्वाचे आहे.

आजच्या काळात स्त्री नेतृत्वाचे विविध आयाम दिसून येतात. प्रशासन, न्यायव्यवस्था, विज्ञान-तंत्रज्ञान, संरक्षण, कला, साहित्य, माध्यमे अशा सर्व क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील महिला सरपंचांनी गावविकासाची दिशा बदलली आहे; स्वयंसेवी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे; संशोधक महिलांनी नवकल्पना साकारल्या आहेत. या सर्व उदाहरणांमुळे स्त्रीशक्तीचे व्यापक आणि बहुआयामी स्वरूप स्पष्ट होते. मात्र,



प्रतिनिधित्वाची संधी सर्व स्तरांपर्यंत पोहोचावी, यासाठी संरचनात्मक अडथळे दूर करणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवरही महिला सशक्तीकरण हा विकासाचा प्रमुख अजेंडा ठरला आहे. लिंगसमानता ही शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाची संकल्पना आहे. शिक्षण, आरोग्य, आर्थिक संधी, राजकीय सहभाग आणि हिंसामुक्त जीवन या सर्व घटकांचा समावेश लिंगभाव न्यायात होतो. महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक देश आपापल्या प्रगतीचा आढावा घेतो आणि उर्वरित अंतर भरून काढण्यासाठी धोरणे आखतो. भारतानेही 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ', 'उज्ज्वला', 'सुकन्या समृद्धी' यांसारख्या योजनांद्वारे मुलींच्या सक्षमीकरणाचा प्रयत्न केला आहे; परंतु या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती तितकीच गरजेची आहे.

स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न केवळ महिलांचा नसून संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी निगडित आहे. ज्या समाजात स्त्रीला सन्मान, सुरक्षा आणि संधी मिळतात, तो समाज अधिक सर्जनशील, समताधिष्ठित आणि प्रगतिशील बनतो. घर, शाळा, कार्यक्षेत्र आणि सार्वजनिक जीवन या सर्व स्तरांवर लिंगसमानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. पुरुषांनीही या परिवर्तन प्रक्रियेत सक्रिय सहभागी होणे गरजेचे आहे. कारण समानतेची लढाई ही परस्पर विरोधाची नसून सहकार्याची आहे. महिला दिन आपल्याला भूतकाळातील संघर्षांची आठवण करून देतो, वर्तमानातील यशाचा गौरव करतो आणि भविष्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देतो. आज घोषणांपेक्षा कृतीची, प्रतीकात्मक सन्मानापेक्षा वास्तविक संधींची आणि तात्पुरत्या उत्साहापेक्षा सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे. प्रत्येक मुलीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, सुरक्षित वातावरण, आरोग्यसेवा आणि स्वप्नपूर्तीची संधी मिळाली पाहिजे. प्रत्येक महिलेला निर्णयप्रक्रियेत स्थान, आर्थिक स्वावलंबन आणि सन्माननीय आयुष्याचा अधिकार मिळाला पाहिजे.

८ मार्चचा दिवस हा केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नसून समाजपरिवर्तनाची प्रेरणा आहे. स्त्रीच्या कर्तृत्वाला मान्यता देताना तिच्या वेदनांना आणि संघर्षांना विसरून चालणार नाही. समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी शासन, समाज आणि कुटुंब या तिन्ही स्तरांवर एकात्मिक प्रयत्नांची गरज आहे. नारीशक्तीचा सन्मान, संरक्षण आणि सशक्तीकरण हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल – लरसरींश.रिक्षशपवीर५स-रळश्र.लो**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सर्वच बँकांचे पीक कर्ज माफ होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नगर (प्रतिनिधी) : ज्या बँकांना पीक कर्ज देण्याचा अधिकार आहे, त्या बँकांतून पीक कर्ज घेतलेल्या सर्वच शेतकऱ्यांना सरकारच्या २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी येथे पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. यामुळे सरकारच्या कर्जमाफीचा लाभ कोणकोणत्या शेतकऱ्यांना मिळणार? याविषयीची संभ्रमावस्था संपुष्टात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यात त्यांनी शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याची घोषणा केली. पण या कर्जमाफीचा लाभ कोणत्या बँकांकडून घेतलेल्या पीक कर्जावर मिळेल याविषयी वेगवेगळे दावे-प्रतिदावे केले जात होते. पण आता मुख्यमंत्र्यांनी स्वतः याविषयीची स्थिती स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, मी शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली आहे. काही लोक वेगवेगळ्या गोष्टी पसरवण्याचा प्रयत्न करतात. कुणी म्हणतो राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्ज माफ होणार नाही, कुणी म्हणतो जिल्हा बँकेचे होणार नाही, कुणी म्हणतो या सोसायटीची होणार नाही, कुणी म्हणतो त्या सोसायटीची होणार नाही.

पण सरकारने पीक कर्ज देण्याचा अधिकार असणाऱ्या कोणत्याही बँकेने दिलेले २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ आमचा प्रयत्न हा आहे की, माफी शेतकऱ्याला द्यायची आहे बँकेला नाही. त्यामुळे या निर्णयाचा फायदा शेतकऱ्याला व्हावा यासाठी काम सुरू आहे. आम्ही यापूर्वीच सांगितले आहे की, ३० जूनच्या आधी आपण कर्जमाफी करणार आहोत. त्यामुळे आता ही घोषणा बजेटमध्ये करण्यात आल्यामुळे पुढच्या कारवाईला सुरुवात होईल. समिती यावर काम करत आहे. ही समिती यासंबंधीच्या सगळ्या गोष्टी सांगेल. मी एवढेच सांगतो की, ही कर्जमाफी यापूर्वीच्या सर्वच कर्जमाफीच्या निर्णयांहून चांगली आहे. लहरी हवामान, शेतमालाच्या घसरलेल्या किंमती, बी-बियाणे-खतांच्या वाढलेल्या किमती, मजुरीचे वाढलेले दर यामुळे शेतकऱ्यांच्या हातात काहीही शिल्लक राहत नसून कर्ज वाढत चालल्याने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्णयाचे गावागावांत स्वागत केले जात आहे.

**इराण युद्धावर भीतीचे वातावरण तयार करू नका**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी माध्यमांना इराण विरुद्ध इस्त्रायल अमेरिका युद्धावर नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होईल असे चित्र निर्माण न करण्याचेही आवाहन केले. माझी माध्यमांना विनंती आहे की, नागरिकांमध्ये विनाकारण भीतीचे वातावरण करू नये. जी काही परिस्थिती आहे, ती केंद्र सरकार हाताळत आहे. ती केंद्र सरकार सांगत आहे. विनाकारण वेगवेगळ्या बातम्या दाखवून हे घडणार, ते घडणार असे सांगून नागरिकांच्या मनात भीती व संभ्रम तयार करणे हे देशाच्या व समाजाच्या नाही. केंद्र सरकारनेही काल हेच स्पष्टपणे सांगितले आहे, असे ते म्हणाले.

# उन्हाच्या तीव्रतेमुळे ग्रामीण भागातील शाळा सकाळच्या सत्रात भरवा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : प्रतिनिधी सुधाकर रणदिवे, ता.०६ जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये तीव्र उन्हामुळे विद्यार्थ्यांना होणारा त्रास लक्षात घेता,

## राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाची मागणी

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाने शाळेच्या वेळेत बदल करण्याची मागणी केली आहे. संघाने शाळा सकाळी ७:३० ते १२:३० या वेळेत भरावी, अशी विनंती केली आहे.मागिल वर्षी सहा मार्च पासून शाळा सकाळच्या सत्रात भरविण्यात याव्यात असा आदेश प्रशासनाने काढला होता परंतु यावर्षी असा आदेश अद्यापही न निघाल्याने निवेदन देण्यात आले .

ग्रामीण भागातील बहुतांश शाळा टिनशेड (टिन पत्र्याच्या छताच्या) असल्याने वर्गखोल्यांमध्ये उष्णता प्रचंड वाढते. याशिवाय अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याने विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांची कमतरता भासते.यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून, शैक्षणिक प्रगतीवरही नकारात्मक प्रभाव पडण्याची शक्यता आहे.

राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही तीव्र उन्हाळ्यात अशा प्रकारे शाळांच्या वेळेत बदल करण्यात आले आहेत, असे संघाने नमूद केले आहे.

या मागणीचा सकारात्मक विचार करून त्वरित आदेश निर्गमित करावेत, अशी विनंती करण्यात आली. यासंदर्भात प्राथमिक शिक्षणाधिकारी श्री.रविंद्र खंदारे साहेब यांना निवेदन देण्यात आले असून लवकरच आवश्यक कार्यवाही करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

यावेळी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने, राज्य उपाध्यक्ष श्री सुखदेव भालेकर जिल्हाध्यक्ष श्री अनंत फुलसुंदर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# शिव सन्मान पुरस्कार २०२६ ने गोविंद जगताप सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर::प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड

सेवानिवृत्त सहायक पोलीस निरीक्षक व पुरंदरचे सुपूत्र गोविंद जगताप ,यांना उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल रुग्ण हक्क परिषद पुणे शहर यांची वतीने , २०२६ चा शिवसन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले,

स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. ५ मार्च २०२६ रोजी पुणे येथील ऐतिहासिक लालमहाल येथे, रुग्ण हक्क परिषद पुणे शहर, यांच्या वतीने शिवजयंती चे औचित्य साधून, छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श घेऊन विविध क्षेत्रात, उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना शिवसन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, या कार्यक्रमात पुरंदर तालुक्यातील सुपे खुर्द गावचे सुपुत्र व सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद जगताप यांना, रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या हस्ते शिवसन्मान पुरस्कार २०२६, हा पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात आले, यावेळी, सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी चंद्रकांत दैठणकर, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त भानुप्रताप बर्गे, अर्पणा साठे, समन्वयक धर्मादाय मदत कक्ष, राजेंद्र कदम डिवाय पाटील हॉस्पिटल ग्रुप, चव्हाणसर सचिन कुलकर्णी अध्यक्ष सह्याद्री हॉस्पिटल ग्रुप आदी मान्यवरांच्या उपस्थित गोविंद जगताप यांना त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल शिवसन्मान पुरस्कार २०२६ हा पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.

गोविंद जगताप हे रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश संघटक सचिव म्हणून कार्यरत असून या माध्यमातून समाजातील सोशीत वंचित घटकांचे प्रश्न प्रभावीपणे सोडविण्यासाठी ते कायम तत्पर असतात, त्यांना शिवजयंतीच्या निमित्ताने शिवरायांच्या नावाने शिवसन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आल्याने रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष डॉ सतीश केदारी प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळस, पुणे शहराध्यक्ष किशोर पंडागळे यांनी गोविंद जगताप यांचे अभिनंदन केले.




# शरीरासाठी जीवनसत्वाची तर मनासाठी चांगल्या शब्दांची आवश्यकता असते : वि.दा. व्यवहारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :- मानवी शरीरासाठी जीवनसत्वांची आवश्यकता असते तशीच मानवी मनासाठी चांगल्या शब्दांची गरज असते. चांगले शब्द येण्यासाठी वाचन आवश्यक आहे. वाचनासाठी वाचनालयाकडे पाय वळले पाहिजे. वाचनातूनच व्यक्तिमत्व समृद्ध होते. शब्द भांडार वाढतो. आदरयुक्त शब्दाने माणसं जोडली जातात. प्रत्येक माणसांमध्ये संवेदनशीलतेची आवश्यकता आहे. त्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना दररोज वाचनासाठी प्रवृत्त करावे.त्यातूनच आदर्श नागरिक व चांगला समाज घडेल. असे प्रतिपादन वि.दा. व्यवहारे सर यांनी उत्कृष्ट वाचक पुरस्कार समारंभाच्या निमित्ताने बोलताना केले जिजाई प्रतिष्ठान व माणकेश्वर वाचनालय यांचे संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वाचन पुरस्काराचे वितरण करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कवी विवेक उगलमुगले हे होते. ते म्हणाले की, शालेय विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमांच्या पुस्तकाबरोबरच अवांतर वाचन केले पाहिजे. व्यक्तीमत्व विकास घडतो. मोबाईल वरील स्क्रीन टाईम कमी करून वाचनाकडे विद्यार्थी वळला पाहिजे यासाठी जिजाई प्रतिष्ठान आणि माणकेश्वर वाचनालय जे उपक्रम करीत आहे त्याला समाजातून प्रतिसाद मिळाला पाहिजे असे आवाहन उगलमूगले यांनी केले.




जिजाई प्रतिष्ठानचे संस्थापक श्री गुलाब टकले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकात जिजाई प्रतिष्ठान विद्यार्थ्यांसाठी राबवित असलेल्या उपक्रमाची माहिती दिली.माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार यांनी वाचनालयाच्या कार्याचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांना वाचनासाठी वाचनालय हे सदैव खुले राहील विद्यार्थ्यांनी माणकेश्वर वाचनालयात येऊन वाचनासाठी आवश्यक पुस्तके घ्यावीत असे आवाहन त्यांनी केले. जिजाई प्रतिष्ठान चे संस्थापक श्री. गुलाब टकले यांनी विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना पुस्तके दिली. वाचन केलेल्या पुस्तकावर अभिप्राय लिहिण्यासाठी सांगितले. जास्तीत जास्त पुस्तकं वाचण्यासाठी उपलब्ध करून दिले. त्यातून उत्कृष्ट वाचक निवड केली. प्रथम क्रमांक कु. श्रेया माणिक कुशारे, द्वितीय क्रमांक कु. अनन्या सोपान कातकाडे तृतीय क्रमांक अनुष्का हेमंत घुमरे उत्तेजनार्थ कु. अनुजा दुर्गेश देवरे, व संस्कार विनायक सांगळे यांना रोख रक्कम सन्मान चिन्ह, पुस्तकं देऊन सन्मानीत केले उर्वरित ३० विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. कु. अनुजा देवरे व कु. स्वरा मगर यांनी मनोगत व्यक्त केले.सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील पाटील,माणकेश्वर वाचनालयाचे चिटणीस बाळासाहेब कापसे,जेष्ठ संचालक पक्षी मित्र दत्ता काका उगावकर संचालक तन्वीर राजे, सुहास सुरळीकर, राहुल दवते,बाळासाहेब कर्डीले, शिवसेना शहर अध्यक्ष संजय कुंदे, देवदत्त कापसे, माजी सरपंच रघुनाथ कुंदे, अशोक पगारे, निफाड डॉक्टर असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. अरुण कातकाडे, नाशिक दुध संघांचे संचालक साहेबराव ढोमसे ग्रंथपाल नितीन बनसोडे वैनतेय विद्यालयाचे शिक्षक परवेज शेख, कृष्णा बनकर, चंद्रकांत जाधव, सुनील सूर्यवंशी, सुभाष गवळी, संतोष ससाणे, सचिन ढिकले या सह महिला, पालक,विद्यार्थी उपस्थित होते. आभारल मंदाकिनी टकले यांनी तर सूत्रसंचालन रशीद पठाण यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी माणकेश्वर वाचनालय कर्मचारी आरती जंगम,नंदकुमार पुंड यांनी परिश्रम घेतले.

# बेंडभर यांच्या पुस्तकाला राज्यस्तरीय पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर यांच्या समग्र मराठी साहित्यकृतींचा रसग्रहणात्मक अभ्यास या पुस्तकाला बालसंकीर्ण विभागात न्यू हायस्कूल नेवापुर व मराठी बालकुमार साहित्य सभा कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात उत्कृष्ट साहित्य पुरस्कार ३१ व्या मराठी बालकुमार साहित्य संमेलनात संमेलनाध्यक्ष व शाहूवाडी येथील गटशिक्षणाधिकारी मा. डॉ. विश्वास सुतार, पन्हाळा येथील नवशिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश गवंडी, कोल्हापूर येथील मराठी बालकुमार साहित्य सभेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत पाटील, स्वागताध्यक्ष एस. एस. माने यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रोख रक्कम, मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

कोल्हापूर येथील मराठी बालकुमार साहित्य सभेचे २०२५ या वर्षाचे साहित्य पुरस्कार नुकतेच प्रदान करण्यात आले. यात बालसंकीर्ण विभागात सचिन बेंडभर यांच्या समग्र मराठी साहित्यकृतींचा रसग्रहणात्मक अभ्यास या समीक्षणात्मक ग्रंथाला उत्कृष्ट साहित्य पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पन्हाळा येथील गटशिक्षण अधिकारी शिवाजी मानकर, उपाध्यक्ष सदाशिव मोरे, संचालक हंबीरराव कुऱ्हाडे, विजय पाटील, गिरीश कुराडे, अमरसिंह भोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

समग्र मराठी साहित्यकृतींचा रसग्रहणात्मक अभ्यास हा समीक्षणात्मक ग्रंथ असून यात बेंडभर यांनी एकूण ७५ पुस्तकांचे परीक्षण केले आहे. या पुस्तकात प्रा. कुंडलिक कदम, मीनाक्षी पाटोळे, प्रा. अलका सपकाळ, मनोहर मोहरे, शेखर फराटे, विठ्ठल वळसे पाटील, तानाजी धरणे, सुजाता शिंदे, रवींद्र जवादे या नव्या पिढीतील लेखकांबरोबर प्रा.साईनाथ पाचारणे, राजीव तांबे, एकनाथ आव्हाड, आबा महाजन, गणेश भाकरे, संगीता बर्वे, कैलास दौंड, फारुक काझी, सुरेश सावंत, प्रशांत असणारे, डॉ. श्रीकांत पाटील, प्रा. देवबा पाटील, संजय ऐलवाड, सुनिताराजे पवार आणि उत्तम सदाकाळ या नामवंत साहित्यिकांचाही समावेश आहे.

सचिन बेंडभर यांच्या समग्र मराठी साहित्यकृतींचा रसग्रहणात्मक अभ्यास या समीक्षणात्मक ग्रंथाला हा पहिलाच पुरस्कार असून या पुरस्काराबद्दल शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बौद्ध कन्या दिपाली वाघमारे बी.कॉम.तृतिय वर्षात प्रथम ; प्राचार्यांनी केले अभिनंदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड ): वागदरी तालुका तुळजापूर येथील राजकुमार सोमा वाघमारे यांच्या कन्या कुमारी दिपाली राजकुमार वाघमारे यानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)च्या वतीने सन २२४ - २५ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या बी.कॉम. तृतीय वर्ष परीक्षेत रामकृष्ण परमहंस महाविद्यालय धाराशिव मध्ये महाविद्यालयातून प्रथम क्रमांक पटकाविला असून त्यांनी मिळवलेल्या यशा बद्दल कॉलेजचे प्राचार्य डॉ.संदिप देशमुख व परिक्षा प्रमुख प्रा.माधव उगीले यानी प्रशस्ती पत्रक व रामकृष्ण परमहंस गुणवत्ता शिष्यवृत्ती देऊन सत्कार करून अभिनंदन केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर संलग्नित रामकृष्ण परमहंस महाविद्यालय धाराशिव येथे सन २२४-२२५ या शैक्षणिक वर्षाती बि.काँम. तृतीय वर्गात शिकात असलेली दिपाली राजकुमार वाघमारे यानी मार्च-एप्रिल २०२५ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर अंतर्गत घेण्यात आलेल्या बी.कॉम.पदवी परीक्षा दिली होती.त्या परीक्षेचा निकाल नुकतच लागला असून बिष. कॉम.तृतीय वर्षे या पदवी परिक्षेत कुमारी दिपाली वाघमारे यानी रामकृष्ण परमहंस महाविद्यालय धाराशिव मध्ये महाविद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.

त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल कॉलेजचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, तसेच महाविद्यालय विकास समितीचे सन्माननीय सदस्य नानासाहेब पाटील, मराठवाडा सह विभाग प्रमुख प्राचार्य डॉक्ट जयसिंगराव देशमुख आदिच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र व रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाच्या वरिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापकाकडून महाविद्यालयात सर्व विषयांत प्रथम येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना रामकृष्ण परमहंस गुणवत्ता शिष्यवृत्ती दिली जाते त्या शिष्यवृत्तीचा धनादेश देऊन सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

कुमारी दिपाली वाघमारे यांनी मिळालेल्या यशाबद्दल रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वागदरी येथील ग्रामस्थ आदीनी अभिनंदन केले आहे.

## पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात महिला आरोग्य तपासणी शिबिर

## शितल जाधव यांचे प्रतिपादन

# विद्यार्थिनींनो निरोगी आरोग्यासाठी चतुसूत्रीचा अवलंब करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थिनींचे मोबाईल, व्हाट्सअप, फेसबुक आणि ट्विटर मुळे आरोग्याकडे दुर्लक्ष झाले आहे. अशा स्थितीत निरोगी जिवनाचा आनंद घ्यावयाचा असेल तर विद्यार्थिनींनी योग्य आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि स्वच्छता या चतुसूत्रीचा अवलंब करावा असे प्रतिपादन ग्रामीण रुग्णालयाच्या परिचारीका शितल जाधव यांनी केले.

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे रा से यो विभाग, सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सेमी इंग्लिश विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरण सप्ताहात महिला आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते, त्यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.



पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, महिलांच्या आयुष्यात किशोरावस्था, गर्भधारणा, प्रसूती आणि रजोनिवृत्ती असे अनेक शारीरिक बदल घडतात. यावेळी मात्र मुली सतर्क होतात गर्भधारण दरम्यान पोषक आहार, नियमित वैद्यकीय तपासणी आणि विश्रांती अत्यंत गरजेची असते. लोह, कॅल्शियमचा योग्य प्रमाणात आहारात समावेश असल्यास महिलांचे आरोग्य चांगले राहते.

शबाना शिकलगार म्हणाल्या की, शासन संस्थांमार्फत महिलांसाठी आरोग्यविषयक योजना, तपासणी शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जातात.

महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण रुग्णालयात आले पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले, सूत्रसंचलन शिक्षिका कल्पना स्वामी यांनी केले आभार डॉ शितल झिंगाडे-भस्मे यांनी मानले.

आरोग्य शिबिरात शितल जाधव, उज्वला फडतरे शिवानी शिरोदे, शबाना शिकलगार, माधव जिवनगे यांनी सुमारे २४२ विद्यार्थिनींचे रक्तदाब, रक्तातील साखरेचे प्रमाण, हिमोग्लोबिन, रेड ब्लड काउंट, व्हाईट ब्लड काउंट, प्लेटलेट यांची तपासणी केली.

## निरोगी महिला हीच कुटुंबाच्या प्रगतीची ताकद

कुटुंबाची प्रगती महिलांच्या कार्यकर्तृत्वावर अवलंबून असते म्हणून महिलांना आरोग्य विषयक सुविधा देणे गरजेचे आहे, निरोगी महिला हीच कुटुंबाची ताकद आहे असे मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

